## निशाणी ५ वरील आदेश (नि.दि.दा.क्र.१/२०१६)

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ३९ नियम १ व २ प्रमाणे मौजे बामणोली तर्फ कुडाळ, ता. जावली येथील गट नं. ९११ या मिळकतीती असणा–या विहीरीचे पाणी घेण्यास व सदर मिळकतीतील वादीचे कब्जे वहिवाटीस प्रतिवादी नं. १,२ व ६ यांनी हरकत अडथळा करु नये तसेच गट नं. ९११ मधील विहीरीचे पाणी काढण्यासाठी असणारे विज मोटारीची चावी वादी यांना आठवड्यातील २ दिवस प्रतिवादी यांनी द्यावी अशी तुर्तातूर्त ताकिद देण्यासाठी वादी यांनी सदर अर्ज दाखल केला आहे.

वादीचे कथन थोडक्यात खालिप्रमाणे–

२. वादी यांचे कथनानुसार, गट नं. ९११ सह सर्व दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे मुळ पुरुष सखाराम यांच्या वडीलार्जीत मिळकती असून, सखाराम हे सन १९६८ मध्ये मयत झाले. वादी हे प्रतिवादी नं. १ व २ यांचे भाऊ असून, प्रतिवादी नं. ३ ते ५ यांचे चुलते आहेत. सखाराम मयत झालेनंतर, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वाद मिळकतीबाबत वरचेवर भांडणतंटा झालेने, तात्पुरती सोय म्हणून दावा मिळकतीपैकी शेत जमिनी वहिवाटण्यासाठी घेतल्या. यापैकी वादी यांनी गट नं. ९११ ही मिळकत तात्पुरती सोय म्हणून वहिवाटीस मिळाली. परंतू, दावा मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप झाले नाही. दावा मिळकतीत पाण्याची सोय नसलेने, वादी, प्रतिवादी नं. १,२ व त्यांचे मयत भाऊ नथू यांनी गट नं. ९११ मध्ये समाईक खर्च करुन विहीर खोदली व त्याचे पाणी वादी प्रतिवादी दावा मिळकतीसाठी वापरत आहेत. वादी यांनी गट नं. ९११ मध्ये विविध पिके घेतली असून, गट नं. ९११ मधील विहीरीचे पाणी सदर पिकासाठी देत आहेत. अशी परीस्थीती

असताना, दिनांक १०.१२.२०१५ रोजी प्रतिवादी नं. १ यांनी गट नं. ९११ मधील विहीरीवर स्वतःचा हक्क असल्याचे सांगून विहीरीचे पाणी व मोटारची चावी देण्यास वादीला नकार दिला. प्रतिवादी नं. २ व ६ यांनी प्रतिवादी नं. १ ला साथ देवून, विहीरीचे पाणी देण्यास नकार दिला. त्यामुळे गट नं. ९११ मध्ये वादीने घेतलेली पिके वाळून वादीचे नुकसान होत असल्याने, वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदरकामी, प्रतिवादी नं. १ व २ हे दि. २१.२.२०१६ रोजी व प्रतिवादी नं. ६ हे दि. ५.७.२०१६ रोजी दाव्यात हजर झाले. परंतू, त्यांनी विहीत मुदतीत दाव्यास कैफीयत व प्रस्तुत अर्जास म्हणणे न दिल्याने, त्यांच्या म्हणण्याशिवाय सदर अर्जाचे काम चालविण्याचा आदेश दि. १३.९.२०१६ रोजी पारीत झाला.

४. खालील वादप्रश्न माझ्या विचारार्थ निर्माण होतात, त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. वादी सकृतदर्शनी केस शाबीत करतात काय ? | .. होकारार्थी |
| २. न्यायाचे समतोलत्व वादीचे बाजूने आहे काय ? | .. होकारार्थी |
| ३. मनाईचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | .. होकारार्थी |
| ४. आदेश काय ? | .. अर्ज मंजूर करणेत आला. |

## कारणमिमांसा

५. वादी यांचे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी नं. १,२ व ६ यांचे विधीज्ञ

यांनी युक्तिवाद केला नाही. नि. ७ येथील गट नं. ९११ चा ७/१२ उतारा पहाता, त्यात वादी तसेच प्रतिवादी नं. १ ते ५ यांचे नावे मालक सदरी समाईकात नोंद असल्याचे, तसेच पिक पहाणी सदरी २ आर क्षेत्रात विहीरीची नोंद असल्याचे दिसून येते. यावरुन, गट नं. ९११ ही मिळकत वादी व प्रतिवादी यांची समाईक मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची मिळकत असल्याचे दिसून येते. तसेच गट नं. ९११ व अन्य मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान सरसनिरस मानाने वाटप झाले नसल्याचे दिसून येते. गट नं. ९११ चे पिकपहाणी सदरी सोयाबीन, शाळू, गहू इ. पिकांची सन २०१४–१५ या वर्षासाठी नोंद आहे. यावरुन, दावा मिळकतीत वादी यांनी पिके घेतली असल्याचे वादींचे कथनास पुष्टी मिळते. दावा मिळकत गट नं. ९११ ही मिळकत वादी व प्रतिवादी यांची समाईक असल्याने त्यातील विहीर ही देखील समाईक असल्याचे नि. ७ येथील ७/१२ उता– यावरुन दिसून येत असल्याने सदर विहीरीचे पाणी पिकासाठी वापरण्यास वादी यांना समाईकात हक्क आहे हे स्पष्ट होते. प्रतिवादी यांनी वादी यांची सदर कथने आव्हानीत केली नाहीत. त्यामुळे वादी यांना प्रथमदर्शनी केस असल्याचे स्पष्ट झाल्याने वादप्रश्न क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी नमुद करीत आहे.

**<u>वादप्रश्न क्रमांक २ व ३ करीताः</u>**–

६. गट नं. ९११ मधील वादी यांनी घेतलेल्या पिकांना विहीरीचे पाणी न मिळालेस सदर पिके वाळून वादी यांचे अपरीमीत नुकसान होण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे सोईची बाब वादीचे बाजूने आहे. सबब, वादप्रश्न क्रमांक २ व ३ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत आहे. वरील विवेचनाचा आढावा घेता, गट नं. ९११ मधील वादीचे कब्जेवहिवाटीस व विहीरीचे पाणी घेण्यास प्रतिवादी नं. १,२ व ६ यांनी हरकत करु नये अशी तुर्तातुर्त ताकिद मिळण्यास वादी हक्कदार

आहेत. तसेच वादीने विनंती केलेनुसार, आठवड्यातून २ दिवस म्हणजे सोमवार व गुरुवार या २ दिवशी गट नं. ९११ मधील विहीरीचे पाणी काढण्यास ठेवलेल्या विज मोटारीची चावी प्रतिवादी यांनी वादी यांना द्यावी अशी तुर्तातुर्त ताकिद मिळण्यास वादी हक्कदार आहेत. सबब, खालिलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे. सबब, मी खालील आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. ५ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी नं. १,२ व ६ यांनी गट नं. ९११ मधील वादीचे कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा करु नये, तसेच गट नं. ९११ मधील समाईकातील विहीरीचे पाणी घेण्यास वादींनी अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकिद प्रस्तुत दाव्याचे अंतिम निकालापर्यंत देण्यात येत आहे.

३. प्रतिवादी नं. १,२ व ६ यांनी गट नं. ९११ मधील विहीरीचे पाणी काढण्यास ठेवलेल्या विज मोटारची चावी आठवड्यातील सोमवार व गुरुवार या २ दिवशी वादी यांना द्यावी अशी तुर्तातुर्त ताकिद प्रस्तुत दाव्याचे अंतिम निकालापर्यंत देण्यात येत आहे.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

( गि.म.साधले )

दिनांकः २७.९.२०१६ दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर,)मेढा.